| | |
|---|---|
| | **महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग**<br>राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,<br>८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०. |

## कार्यालयीन आदेश

आदेश क्र. राज्यकर आयुक्त / २०२३/ अतिरिक्त मनुष्यबळ/ पुनर्रचना कक्ष / धा.क्र. १२१, दि. 12 APR 2023

संभाजीनगर (औरंगाबाद) विभागातील अन्वेषण शाखेसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे खालील प्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

| | सध्याचे मनुष्यबळ | अतिरिक्त मनुष्यबळ | एकूण मनुष्यबळ |
|---|---|---|---|
| राज्यकर उपायुक्त | १ | ० | १ |
| राज्यकर सहायक आयुक्त | २ | २ | ४ |

**अन्वेषणासाठी स्थानांतरित व समायोजित होणारे पदे**

| अ.क्र. | पदनाम | स्थानांतरित होणारे पदे | | अन्वेषणासाठी समायोजित पदे |
|---|---|---|---|---|
| | | सध्याचा महाविकास सांकेतांक | विभाग | प्रस्तावित महाविकास सांकेतांक |
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| १ | राज्यकर सहा.आयुक्त | AUR-VAT-D-004 | अन्वेषण | AUR-INV-D-003 |
| २ | राज्यकर सहा.आयुक्त | AUR-VAT-D-007 | अन्वेषण | AUR-INV-D-004 |
| ३ | राज्यकर निरीक्षक | AUR-GEN-B-80 | अन्वेषण | AUR-GEN-B-80 |
| ४ | राज्यकर निरीक्षक | AUR-GEN-B-81 | अन्वेषण | AUR-GEN-B-81 |
| ५ | राज्यकर निरीक्षक | AUR-GEN-B-87 | अन्वेषण | AUR-GEN-B-87 |
| ६ | राज्यकर निरीक्षक | AUR-GEN-B-88 | अन्वेषण | AUR-GEN-B-88 |
| ७ | कर सहायक | AUR-GEN-A-068 | अन्वेषण | AUR-GEN-A-068 |
| ८ | कर सहायक | AUR-GEN-A-069 | अन्वेषण | AUR-GEN-A-069 |

वरील राज्यकर सहायक आयुक्त यांची पदे त्यांच्या अधिपत्याखालील राज्यकर निरीक्षक व कर सहायकासहीत सध्याच्या विद्यमान विभागातून संभाजीनगर (औरंगाबाद) अन्वेषण विभागात स्थानांतरीत करण्यात येत आहे. उपरोक्त अतिरिक्त मनुष्यबळ अन्वेषण शाखेस उपलब्ध करून देताना ज्या विभागातून राज्यकर सहायक आयुक्त ही पदे उपलब्ध करून देण्यात येत आहेत त्या विभागातून प्रति अधिकारी दोन (2) राज्यकर निरीक्षक व एक (1) कर सहायक ही पदे देखिल उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उपरोक्त तक्त्यानुसार पदे स्थानांतरित करून अन्वेषण शाखेत वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबतचा आदेश पारित करण्यात येत आहे. जी नविन पदे अन्वेषण विभागासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत, त्यांचे आहरण व संवितरण अधिकारी पूर्वी प्रमाणेच AUR-DDO-C-001 (DDO) हे असतील.

संभाजीनगर (औरंगाबाद) विभागातील अन्वेषण शाखेत सध्या १ राज्यकर उपायुक्त व २ राज्यकर सहायक आयुक्त इतकी पदे मंजूर आहेत. सदरच्या शाखेत राज्यकर सहायक आयुक्तांची २ पदे वाढविण्यात येत आहेत. सबब संभाजीनगर (औरंगाबाद) येथील सध्याच्या अन्वेषण शाखेच्या संरचनेत पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| **संभाजीनगर (औरंगाबाद) अन्वेषण शाखा** | **सध्याची संरचना** | **प्रस्तावित संरचना** |
|---|---|---|
| राज्यकर उपायुक्त | १ | १ |
| राज्यकर सहायक आयुक्त | २ | ४ |

सदर बदला नंतर पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. ज्या विभागातून पदे स्थानांतरीत होतील व ज्या अन्वेषण विभागामध्ये पदे अंतर्भूत होतील त्या संबंधित विभागांचे सुधारित प्रपत्र-‘अ’ (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांचे कार्यालयनिहाय व संवर्गनिहाय पदवाटप) व प्रपत्र-‘ब’ (मुख्य करविषयक संवर्गातील पदांची व इतर संवर्गातील पदांची पदनामे व महाविकास संकेतांक) निर्गमित करणे.

२. उपरोक्त नमुद पदांच्या स्थानांतरणांची प्रक्रिया सुलभतेने पार पाडण्याच्या दृष्टीने राज्यकर सहआयुक्त (महाविकास), मुंबई यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

i.वरीलप्रमाणे सुधारित महाविकास संकेतांकांचे प्रपत्र -ब निर्गमित केल्यानंतर नवीन महाविकास सांकेतांक प्रणालीवर अंतर्भूत करणे व जे महाविकास सांकेतांक पदांच्या स्थानांतरणामुळे रद्द होत आहेत ते गोठवणे (Freeze) .

ii. राज्यकर सहायक आयुक्त यांची जी पदे अन्वेषण शाखेत स्थानांतरित होणार आहेत, त्या पदांना नेमून (allot) दिलेली व्यापाऱ्यांची प्रकरणे समप्रमाणात इतर अधिकाऱ्यांना स्थानांतरित करणे.

iii. स्थानांतरित होणाऱ्या पदांच्या कार्यभारातील प्रलंबित कामांचे (Work Items) फेरवाटप त्या-त्या विभागातील इतर अधिकाऱ्यांमध्ये करदात्यांनुसार करणे.

३.अन्वेषण शाखेत स्थानांतरित झालेल्या राज्यकर सहायक आयुक्त यांना त्याच्या नविन महाविकास सांकेतांकासह संभाजीनगर (औरंगाबाद) विभागातील कार्यक्षेत्र देण्याबाबतची तसेच अन्वेषणाचे अधिकार देण्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही, राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय)१ यांनी करावी.

४. वर नमूद केल्याप्रमाणे नागपूर विभागातील अन्वेषण शाखेत वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे आदेश शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक/विकवि १२१९/प्र.क्र.०२/वि.प्र.४ दि.२५/०२/२०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

(राजीव कुमार मितल)
भा.प्र.से.
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:

१. विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.

२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई

३. सर्व अपर राज्यकर आयुक्त

४. सर्व राज्यकर सहआयुक्त

५. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी व स्टाफ ऑफिसर

६. सर्व आस्थापना अधिकारी

७. निवडनस्ती

८. स्थळ प्रत.